पीकपाणी

# आले मिळवून देईल नफा!



**प्रा. दर्शना मोरे**
(मो.नं. ९६८९२१७७९०)
क.का. वाघ. उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक



आल्यासाठी मध्यम खोलीची, उत्तम निचरा असलेली कसदार जमीन उत्तम असते. नदीकाठच्या पोयट्याच्या गाळमिश्रित जमिनीत आले उत्तम येते. जमिनीवर तुंबून राहिलेले पाणी या पिकास नुकसानकारक असते. तसेच जमिनीत विम्लतेचे प्रमाण जास्त नसावे, एकाच जमिनीत वरचेवर आले घेऊ नये कारण त्यावर येणाऱ्या मर रोगाचे नियंत्रण करणे अवघड जाते.

आले या वनस्पतीची लागवड पौराणिक काळापासून केली जाते. विशिष्ट चव व स्वाद यामुळे दररोजच्या जेवणातील मसाल्यात आल्याचे महत्त्वाचे स्थान आहे. ओले आले, प्रक्रिया करून टिकवलेले आले अथवा सुंठ अशा स्वरुपात आल्याचा उपयोग करतात. जमिनीतील आल्याच्या खोडाचा उपयोग मसाल्यासाठी करतात.

आल्याला उष्ण व दमट हवामान मानवते. थंडीमुळे आल्याची पानेवाढ थांबते व जमिनीत खोडाची वाढ सुरु होते. समुद्रकिनाऱ्याच्या भागात जेथे २०० सें.मी. किंवा थोडा जास्तच पाऊस पडतो तेथे पावसाळी पाण्यावर घेतले जाते. समुद्रसपाटीपासून १०० ते १५०० मीटर उंचीपर्यंतच्या प्रदेशात आल्याची लागवड करण्यात येते.



आल्यासाठी मध्यम खोलीची, उत्तम निचरा असलेली कसदार जमीन उत्तम असते. नदीकाठच्या पोयटयाच्या गाळमिश्रित जमिनीत आले उत्तम येते. जमिनीवर तुंबून राहिलेले पाणी या पिकास नुकसानकारक असते. तसेच जमिनीत विम्लतेचे प्रमाण जास्त नसावे, एकाच जमिनीत वरचेवर आले घेऊ नये कारण त्यावर येणाऱ्या मर रोगाचे नियंत्रण करणे अवघड जाते.

**पूर्वमशागत**

आल्याचे गड्डे जमिनीत वाढत असल्यामुळे सखोल पूर्वमशागत करणे गरजेचे असते. जमीन लोखंडी नांगराने ३०-४० सें.मी. खोल उभी आडवी नांगरून घ्यावी. ३-४ कुळवाच्या पाळ्या देऊन माती भुसभुशीत करून घ्यावी. या पिकाच्या लागवडीसाठी जमिनीची आखणी निरनिराळ्या पद्धतीने केली जाते. हलक्या जमिनीत सपाट वाफे पध्दत, मध्यम व भारी जमिनीत सऱ्या-वरंबे पध्दत वापरतात. जमिनीत हेक्टरी ४० गाड्यांपर्यंत (२० टन) शेणखत टाकावे.

महाराष्ट्रातील काळ्या जमिनीत रुंद वरंब्याची पध्दत फायदेशीर ठरली आहे. सपाट वाफे ३ X २ मीटर आकाराचे करतात. दोन वरंब्यात ६० सें.मी. अंतर ठेवतात तर गादी वाफ्यावर लागवड करताना ३ X १ मीटर आकाराच्या १५-२० सें.मी. उंच वाफ्यावर लागवड करतात.

**बियाण्याची निवड आणि लागवडीची वेळ**

महाराष्ट्रात माहीम या स्थानिक जातीची लागवड करतात. या जातीमध्ये मोक्या व आंगऱ्या असे दोन प्रकार आढळतात. चांगल्या प्रतीचे निरोगी ३-५ सें.मी. लांबीचे व अंदाजे २०-२५ ग्रॅम वजनाचे आणि २-३ कोंब रुजण्याइतपत डोळे असलेले बेणे निवडावे. एक हेक्टर लागवडीस साधारणपणे १४०० ते २००० किलो बेणे लागते. सध्या वाफ्यात आल्याची लागण २५ X २२.५ सें.मी. अंतरावर करतात. बेणे ४-५ सें.मी. खोल लावून मातीने झाकावे. लागण कोरडीत करून हलके पाणी सोडून वाफे भिजवतात. गड्डा लावताना कोंबांची टोके जमिनीच्या वरच्या बाजूस येतील अशी काळजी घेऊन लागण करावी.

आले किडी आणि रोगांना संवेदनशील असल्याने कंद लागवडीच्या वेळी प्रतिबंधक उपाय म्हणून डायथेन-झेड-७८ आणि नुआक्रॉन अनुक्रमे २५० ग्रॅम आणि १०० मि.लि., १०० लिटर पाण्याच्या मिश्रणात बुडवून लावावेत. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत आल्याची लागवड करतात.

**आंतरमशागत**

लागवडीनंतर १५-२० दिवसांत कोंब जमिनीच्या वर दिसू लागतात. त्यानंतर लगेच कोंबांना धक्का लागणार नाही, अशी काळजी घेऊन वाफ्यातील तण काढून घ्यावे. वेळोवेळी हातखुरपणी करून तण काढावे. पीक १२० दिवसांचे झाल्यावर हलकी खोदणी करून वरखताचा दुसरा हप्ता द्यावा. त्यामुळे गड्ड्यांची नीट वाढ होण्यास मदत होते.

**पाणी** : लागण होताच एक हलके पाणी द्यावे. पाऊसमान लक्षात घेऊन दर ६ ते ८ दिवसांनी पिकास पाणी द्यावे. पिकात पाणी साचून राहू नये याची काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे.

**वरखते** : लावणीच्या वेळी १०० किलो अमोनिअम सल्फेट, ३०० किलो सुपर फॉस्फेट व ८० किलो म्युरेट ऑफ पोटॅश वाफ्यात टाकावे व त्यानंतर ६ ते ८ आठवड्याने ५० किलो व १२० दिवसांनी १०० किलो युरिया द्यावा.

**काढणी व उत्पादन**

आल्याचे पीक ७ महिन्यांत तयार होते. मात्र आले सुंठीकरता लावले असल्यास ८.५ ते ९ महिन्यांत पीक तयार होते. जानेवारी महिन्यात पाने पिवळी पडून वाळू लागतात. वाळलेला पाला कापून पालापाचोळा वेचून घ्यावा. कुदळीने खोदून आल्याच्या गड्ड्यांची काढणी करतात. खणताना गड्ड्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. आले वेचून पाण्याने स्वच्छ धुवून गड्डे व बोटे (नवीन आले) वेगवेगळी करावी. हेक्टरी उत्पादन १०-१५ टनांपर्यंत येऊ शकते.

काढणीच्या वेळी चांगला भाव नसेल तर आले न काढता त्यास दर १० दिवसांनी पाणी देणे चालू ठेवतात. एप्रिलअखेर कंदांवर पुन्हा फुटवे येऊन त्यांची वाढ सुरु होते. त्यानंतर त्यास वाढ व पोषणासाठी आधीच्या पोषणाइतकीच खते द्यावीत. अशी द्विहंगामी पीककाढणी पुढील ऑगस्टमध्ये करतात. या पिकाचे उत्पादन हेक्टरी ३० ते ४० टनांपर्यंत येते.

**सुंठ तयार करणे :** आले जमिनीतून काढल्यानंतर त्यावरील माती पाण्याने धुवून काढतात व आले स्वच्छ धुवून घेतात. उन्हात सुकविल्यावर हे आले पुन्हा पाण्यात भिजू देतात. साल नरम झाल्यावर आले पाण्यातून काढून त्यावरील साल कोरड्या फडक्याने घासून काढतात. त्यानंतर चुन्याच्या निवळीत तीन टप्प्यांमध्ये भिजत ठेवतात. त्यानंतर हवाबंद खोलीत गंधकाची धुरी देतात. परत उन्हात सुकवून ६ तास गंधकाची धुरी देतात. नंतर उन्हात चांगले सुकवतात. अशा तऱ्हेने तयार झालेली सुंठ ओल्या आल्याच्या मानाने १५ ते २० टक्के या प्रमाणात मिळते. दरहेक्टरी ७५०० किलो आले असेल तर १८५० किलो सुंठ मिळते.



**कीड :** खोडमाशी - ही माशी खोडावर उपद्रव करते. या माशीच्या नियंत्रणासाठी १०० मि.लि. कोणतेही कीटकनाशक १०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

कंदमाशी : या माशीच्या नियंत्रणासाठी १० दाणेदार फोरेट हेक्टरी २० किलो टाकतात.

उन्नी (हुमणी) : या किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास जमिनीत आले लावताच १० टक्के बी.एच.सी. ५० किलो हेक्टरी या प्रमाणात खताबरोबर मिसळावी. तसेच बी.एच.सी.बरोबर ५०० किलो नीमपेंड दिली तर कीडनियंत्रण होऊन पिकाला खतही मिळते.

**रोग :** नरम कूज : जमिनीत पाण्याचा निचरा बरोबर न झाल्याने या रोगाचा प्रादुर्भाव होतो. शेंड्याकडून झाड वाळत जाते. बुंध्याचा भाग सडल्यामुळे सहज उपटला जाऊ शकतो. त्यानंतर जमिनीतील गाठे सडण्यास सुरुवात होते.

**उपाय :** १. रोगट झाडे समूळ उपटून नष्ट करावी. २. लावणीपूर्वी व नंतर दर महिन्यास जमिनीवर व पिकावर ५:५:५० चे बोर्डो मिश्रण फवारावे. ३. पिकाची फेरपालट, उत्तम निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड अत्यावश्यक.

**योजना :** केंद्र पुरस्कृत मसाला पीक विकास योजनेअंतर्गत सुधारित जाती, तंत्रज्ञान इत्यादींचा प्रसार होण्याकरिता शेतकऱ्यांना आल्याच्या १० आरच्या प्रात्यक्षिक प्लॉटला येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रुपये १२०० देण्यात येतात.

परसबागेत आल्याची लागवड करण्याकरिता ५ किलो बेणे आणि पीक संरक्षणाकरिता खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रुपये १००/- चे मर्यादित अनुदान देण्यात येते. ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता **मोबाईल नंबर**सह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला **पासपोर्ट आकाराचा फोटो**ही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'** ■